|| शौचालय नाही ज्यांच्याघरी देऊ नका त्यांना पोरी || शौचालय ज्यांच्याघरी आरोग्य तेथे वास करी

# ग्रामपंचायत कार्यालय जाधववाडी राऊतवाडी

श्री. विठ्ठल भिमाजी जाधव
(सरपंच) ९८८१६१७७२५

ता. पारनेर, जि. अहमदनगर

सौ. उषा संतोष जाधव
(उपसरपंच) ९६२३५३९२३२

56

जावक क्र. :

दिनांक : / / २०२

प्रति,

मा. लोकनेते निलेशजी लंके साहेब,

मान. आमदार पारनेर नगर विधानसभा मतदार संघ

विषय : मौजे जाधववाडी राऊतवाडी ग्रामपंचायत हददीतील मारूती मंदिर ते ढवळेवस्ती रस्ता डांबरीकरण करून मिळणेसाठी ...

महोदय,

वरील विषयान्वये विनंती अर्ज करतो की मौजे जाधववाडी राऊतवाडी हे गाव डोंगरी विभाग विकासांतर्गत येत असून ग्रामपंचायत हददीतील मारूती मंदिर ते ढवळेवस्ती हया १.९ किमी लांबीच्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. त्यातील १ किमी रस्ता २00३.0४ मध्ये डांबरीकरण झाला होता. २० वर्षात सदर रस्त्याची साधी डागडूजीही करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्या रस्त्यावर मोठे खडडे पडून दुरावस्था झाल्याने छोटे मोठे अपघात घडत आहेत. त्यापैकी ९00 मीटर कच्च्या रस्त्याचे नुकतेच फक्त खडीकरण झालेले आहे. पावसाळयात त्या रस्त्यावर पाणी साचून मोठया प्रमाणात चिखल होऊन नागरीकांना ये जा करणे खूप कठीण होते. तरी कृपया त्यासाठी निधी मंजूर करावा ही विनंती.

सरपंच
ग्रामपंचायत जाधववाडी, राऊतवाडी
ता. पारनेर, जि. अ. नगर